# विभाग ३ : लोकप्रशासन

## प्रस्तावना




राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांची समान ध्येये आहेत. दोन्ही विषयांमध्ये समाजातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक बाबींचा अभ्यास होतो आणि या ज्ञानाचे समाज कल्याणासाठी उपयोजन केले जाते. राज्यशास्त्रात धोरणनिर्मिती केली जाते आणि लोकप्रशासनात धोरणाची अंमलबजावणी होते. केंद्र, घटक राज्ये व स्थानिक शासनसंस्थांच्या कारभारविषयक यंत्रणेस 'लोकप्रशासन' म्हणून ओळखले जाते.

मग लोकप्रशासन म्हणजे काय? लोकप्रशासनाबद्‌दल दोन दृष्टिकोन आहेत.

(i) एक म्हणजे सामान्य दृष्टिकोन. यामध्ये पुढील बाबींवर भर दिला जातो.

- कार्याचे नियोजन व रूपरेषा तयार करणे.
- निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी संघटनेची रचना करणे.
- कार्ये पूर्ण होण्यासाठी लोकांची नियुक्ती करणे.
- कार्ये योग्यरीत्या पूर्ण होण्यासाठी समन्वय साधणे.
- कार्यासाठी वित्त प्रदान करणे.

(ii) दुसरे म्हणजे विशेष दृष्टिकोन. यामध्ये अनेक विशेष कार्यांचा समावेश आहे. कायदा व

सुव्यवस्था राखणे, शिक्षणाची तरतूद करणे, सार्वजनिक आरोग्य राखणे, कृषी क्षेत्राला उत्तेजन, सामाजिक सुरक्षिततेची शाश्वती, इत्यादी. यांतील प्रत्येक कार्य विशेष आहे आणि त्यासाठी विशेष कौशल्याची आवश्यकता असते. उदा., सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी डॉक्टर, तर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची आवश्यकता असते. ही देखील लोकप्रशासनाचीच कार्ये आहेत.

या कार्यांचे प्रशासन (व्यवस्थापन) जेव्हा शासन करते, तेव्हा 'लोकप्रशासन' हा शब्दप्रयोग केला जातो. खासगी संस्था किंवा अशासकीय संघटनांच्या संदर्भात 'खासगी प्रशासन' किंवा 'व्यावसायिक प्रशासन' असे शब्दप्रयोग केले जातात. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी इत्यादी हे भारतातील लोकप्रशासनातील विविध घटक आहेत.

लोकप्रशासन या अभ्यासशाखेचा उदय अमेरिकेत झाला. वूड्रो विल्सन यांनी लोकप्रशासन विषयाच्या अभ्यासावर प्रथम भर दिला. शासनाने कसे कार्य करायचे आणि देशाचे प्रशासन कसे असावे याबद्दलचे भारतातील संदर्भ प्राचीन काळातही आहेत. उदा., कौटिल्याचे अर्थशास्त्र, छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र तसेच मुघलांचे प्रशासन. ब्रिटिशांनी भारतीय नागरी सेवा सुरू केली व भारतीय प्रशासकीय व्यवस्था स्थापन झाली. स्वतंत्र भारतात भारतीय प्रशासकीय सेवा आणि राज्य प्रशासकीय सेवा आहेत.

आज शासनातील जटिलता वाढली आहे. प्रशासनाच्या सामान्य दृष्टिकोनापलीकडे जाऊन अनेक कार्ये हाती घेतली जातात. शासकीय कार्ये अभ्यासण्याच्या नवीन दृष्टिकोनाला सार्वजनिक धोरण (Public Policy) असे म्हटले जाते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये लोकप्रशासन आणि सार्वजनिक धोरण यांमध्ये अनेक बदल झाले आहेत. विकासाच्या मुद्द्यावर भर दिला जात आहे. या नवीन दृष्टिकोनाला 'विकास प्रशासन' असे म्हणतात. विकास प्रशासनात देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित केले आहे.

विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध विकासात्मक प्रकल्प, कार्यक्रम व योजना यांवर भर दिलेला दिसून येतो.

या भागातील दोन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

**प्रकरण सात : लोकप्रशासन :** यामध्ये लोकप्रशासन विषयाचा परिचय दिलेला आहे. राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. लोकप्रशासनाच्या अभ्यासाची व्याप्ती आणि सार्वजनिक धोरण या संकल्पनेची ओळख दिलेली आहे.

**प्रकरण आठ : विकास प्रशासन :** पारंपरिक लोकप्रशासनात नियम, कायदे, पदसोपानरचना याची बांधिलकी दिसून येते. हा दृष्टिकोन चुकीचा नाही, पण कधी कधी यामुळे वेळेचा अपव्यय आणि अडथळे निर्माण होऊ शकतात. याला 'लाल फित' किंवा 'दफ्तर दिरंगाई' असे म्हणतात. सामाजिक बदल घडवण्यासाठी नवकल्पनांची गरज भासते. या दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात. भारतातील विकास प्रशासनाची अंमलबजावणी कशी होते, यावरही या प्रकरणात चर्चा करण्यात आली आहे.